पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. २५
वर्ष ८ वे, अंक १८ वा
किंमत १ रुपया
६ जानेवारी १९९२

शेतकरी संघटक

# सहकारी सूत गिरणीचा नफा, कापूस उत्पादकांची लूट

**– विजय जावंधिया, वर्धा**

सहकारी सूत गिरण्यांची स्थापना कापूस शेतकऱ्यांना कापड मिल मालकांच्या व रूई व्यापाऱ्यांच्या शोषणातून मुक्त करून सुताच्या भावाच्या तुलनेत कापूस उत्पादकांना कापसाचा भाव मिळवून देण्यासाठी करण्यात आली आहे. परंतु वास्तविकता ही आहे की सहकारी सूत गिरण्या रूईचे बाजारभाव व सरकीचे भाव ह्यांच्यावर आधारीत कापसाला भाव देत नाहीत. महाराष्ट्रातील कापूस एकाधिकार योजनेचा फायदा घेवून ह्या सहकारी सूत गिरण्यांनी आजपर्यंत कापूस एकाधिकार योजनेने जो भाव दिला तोच भाव दिला आहे. कापूस एकाधिकार योजना शेतकऱ्यांचा सर्वच कापूस खरेदी करीत असते तर सहकारी सुत गिरण्या फक्त उच्च प्रतीचा कापूस खरेदी करतात. म्हणजेच गावरानी भाषेत "मलाई" सूत गिरणीला व कचरा एकाधिकार योजनेला. तरी सूत गिरणी अतिरिक्त भाव देत नाही.

सहकारी सूत गिरण्यांनी कापूस एकाधिकार योजनेची तुलना करून भाव देणे अन्यायकारक आहे. कारण कापूस एकाधिकार योजनेचा प्रति क्विंटल व्यवस्थापनाचा खर्च फार जास्त आहे. योजनेचा प्रती क्विंटल खर्च सुमारे १३०/- रु. क्विंटल असावा असा अंदाज आहे. सहकारी सूत गिरणीचा खर्च ह्यापेक्षा ४० ते ५० रु. प्रति क्विंटल कमी असावयास पाहिजे. थोडक्यात, सह. सूत गिरण्या "मलाई" कापूस खरेदी करतात व एकाधिकार योजनेपेक्षा कार्यक्षमतेने खरेदी होऊ शकते तरी कापूस एकाधिकार योजनेचे भाव देणे म्हणजे कापूस उत्पादकांच्या लुटीला हातभार लावणे आहे. वास्तविकता ही आहे की सह. सूत गिरण्यांनी कापूस एकाधिकार योजनेची जी अंतिम किंमत आहे त्यापेक्षा १०० रु. ते १५० रु. प्रती क्विंटल जास्त भाव देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे व हे भाव दिल्यानंतर सुतापर्यंतच्या सहकारी प्रक्रियेचा उद्देश पूर्ण होईल व भांडवलदारांद्वारे होणारे शेतकऱ्यांचे शोषण जगापुढे मांडता येईल. परंतु, कच्चा माल बाजारभावापेक्षा कमी भावाने किंवा त्याच भावाने विकत घ्यायचा व पक्का माल जास्त भावाने विकायचा व नफा कमवायचा. ह्यात खाजगी सूत गिरणी व सहकारी सूत गिरणीत फरक काहीच राहत नाही.

वर्धा जिल्हा शेतकरी सह. सूत गिरणी मर्यादित च्या ९०-९१ च्या अहवालाचा अभ्यास केला तर हे स्पष्ट आहे की ८७-८८ पेक्षा ८८-८९ ला सुताचे भाव जास्त होते व ८८-८९ पेक्षा ८९-९० ला सुताचे भाव जास्त होते. तर दुसरीकडे कापूस उत्पादकांना कमी भाव देण्यात आले आहेत. ह्यावरून हे स्पष्ट आहे की सह. सूत गिरणीला झालेला नफा हा कापूस उत्पादकांची लूट करूनच झाला आहे. खालील माहिती ह्या विधानाची पुष्टी करण्यास परिपूर्ण आहे.

१९८७-८८ साली कापूस एकाधिकार योजनेत संकरीत ४ कापसाची अंतिम किंमत ९२३/- रु. प्रती क्विंटल होती. तर सहकारी सूत गिरणीने दिलेली किंमत ८५०/- रु. होती. १९८८-८९ साली एकाधिकार योजनेची किंमत ८००/- रु. प्रती क्विंटल तर सहकारी सूत गिरणीची ८०० रु. च होती. १९८९-९० ला कापूस एकाधिकार योजनेची किंमत ८३८ रु. व सुत गिरणीची ही ८३८ रु. होती. ह्याचा सारासार अर्थ असा की सह. सूत गिरणी सतत तीन वर्ष स्थिर भावात कापूस खरेदी करीत होती. ८८-८९ साली तर ८७-८८ च्या बाजार भावापेक्षा सुमारे १२५/- रु. प्रती क्विंटल कमी भावात कापूस विकत घेतला व ह्याच दरम्यान सुताच्या भावात वाढ झालेली होती. सरकीचे भाव ही वाढले होते.

या अहवालात जी माहिती दिलेली आहे ती अशी,

१९८७-८८ साली सुताचा सरासरी भाव ३८.५८ प्रती किलोचे होते. १९८८-८९ साली सुताचा सरासरी भाव ४२.४५ प्रती किलोचे होते. १९८९-९० साली सुताचा सरासरी भाव ४५.९७ प्रती किलोचे होते.

म्हणजेच कच्चा माल स्वस्त व पक्का माल महाग ह्या भांडवलशाही आर्थिक नियमाप्रमाणेच सहकारी सूत गिरणीने नफा कमवला आहे. वर्धा जिल्हा सह. सूत गिरणीला २.३० कोटीचा झालेला नफा ह्याचा दुसरा अर्थ असा की कापूस उत्पादकांची २.३० कोटी रुपयाने लूट करण्यात आली आहे.

वर्धा सह. सूत गिरणीचे अध्यक्ष मा. श्री. संतोषरावजी गोडे ह्यांनी या अहवालात जे विचार व्यक्त केले आहे ते सहकारी प्रक्रिया संस्थांच्या मूळ ध्येयाला मूठमाती देणारे आहे. ही भाषा टाटा-बिर्लांच्या भागधारकांच्या सभेतच शोभणारी आहे.

माननीय श्री. गोडेजी म्हणतात, ”कापूस खरेदीच्या बाबतीत संचालक मंडळ तत्परतेने निर्णय घेत असतात. सुत गिरणी किफायतशीर चालविणेसाठी कापूस खरेदी धोरण ठरविण्यासाठी सतर्क रहावे लागते. आपल्या संचालक मंडळाने या बाबतीत अचूक व अभ्यासपूर्वक निर्णय घेतल्यामुळे चांगली व स्वस्त दराची कापूस खरेदी झाली आहे. गिरणीस मोठ्या प्रमाणात कॅशगेन होण्यामध्ये कापूस खरेदीचे धोरण व योग्य निर्णय यांचा सिंहाचा वाटा आहे.“ पुढच्या वाक्यात तर श्री. गोडे साहेबांनी कापूस एकाधिकार योजनेला नागवे करून टाकले आहे. ते म्हणतात, ”आपल्यावर मार्केटींग फेडरेशनचाच कापूस खरेदी करण्याचे बंधन आहे. फेडरेशनकडे आपणाला लागणारा कापूस उपलब्ध नसतो त्यावेळी शासनाच्या परवानगीने आपण खाजगी व्यापाऱ्यांचा कापूस खरेदी केला आहे. अहवाल सालात कापसाचे विक्रमी उत्पादन झाल्यामुळे खुल्या बाजारपेठेत रूईचे भाव मार्केटींग फेडरेशनच्या भावापेक्षा खंडी मागे २००-३०० रु. ने कमी होते व कापसाची प्रत ही उत्तम होती. त्यामुळे मार्केटींग फेडरेशनकडे एच ४ व एम. इ. सी. एच. १ या जातीचा कापूस उपलब्ध असूनसुद्धा भावामधील फरक ध्यानात घेवून खाजगी व्यापाऱ्यांकडून गाठी खरेदी करण्यात आल्या आहेत.“ सहकारमहर्षी श्री. संतोषराव गोडे ह्यांची ही भाषा म्हणजेच टाटा-बिर्लाची नाही का?

कापूस उत्पादकांची लूट करून सह. सूत गिरणीचा नफा, सहकारी सूत गिरणीची कार्यक्षमता मर्यादित आहे हे स्पष्ट करणारा आहे. या सह. सूत गिरण्या कच्चा कापूसच फक्त लाटत नाही तर शेतकऱ्यांच्या मुलांना नौकरी देण्याचे उपकार करून शेतकऱ्यांच्या ह्या तरुण पोरांना मुंबई अहमदाबादच्या तुलनेत कमी पगार देवून त्यांचे श्रम ही लुटत आहेत.

हा सहकार नसून राजकारणाच्या स्वार्थासाठी स्वाहाकार आहे. सह. सूत गिरण्यांचा अहवाल आहे की त्यांनी सुताचा नफा जेव्हा शक्य होईल तेव्हा द्यावा. परंतु तूर्त फेडरेशनच्या अंतिम किंमतीपेक्षा किमान ५० रु. स्वीकारावे.

या सर्व पार्श्वभूमीवर गुजरातच्या कापूस उत्पादक सह. संस्थेनी कापूस उत्पादकांना जास्त भाव देण्याचे पुरावे आहेत. ते भाव इथे देत आहे.

| संकरीत ४ | |
|---|---|
| ८७-८८ | १०५४ रु. |
| ८८-८९ | ८२१ रु. |
| ८९-९० | ८८० रु. |
| ९०-९१ | १११२ रु. |

काही कार्यक्षम सह. खरेदी संस्थानी यापेक्षाही जास्त भाव दिले आहेत.

या सर्व वास्तविकतेतून एक महत्त्वाचा निष्कर्ष असा की कापसापासून सुतापर्यंतच्या प्रक्रियेचा फायदा कापूस उत्पादकांना मिळत नाही. कापसापेक्षा सुत निर्यात करण्याचा जो विचार मांडला जातो तो भांडवलदारांच्या हिताचा आहे हे स्पष्ट आहे. त्यामुळे जास्तीत जास्त रूईच्या गाठी निर्यात करणे व आन्तरराष्ट्रीय बाजारात मंदी असल्यास रोख सवलत देवून कापूस निर्यातीचे धोरण सातत्याने राबविणे आवश्यक आहे. हा या सहकारी सूत गिरणीच्या अहवालाचा दुसरा महत्त्वाचा अर्थ आहे –

कापूस उत्पादकांच्या दृष्टीने दोन मुद्दे स्पष्ट होतात. कार्यपद्धती प्रमाणेच, कच्चा माल स्वस्त व पक्का माल महाग म्हणजेच कापूस उत्पादकांची लूट करून असतो.

२. कापसापासून सुत करून ते निर्यात करण्याचे धोरण कापूस उत्पादकांच्या हिताचे नाही त्या पेक्षा सरळ रूई निर्यात करणे व त्यासाठी आर्थिक सवलत देणे कापूस उत्पादकांच्या व देशाच्या अर्थव्यवस्थेला पोषक आहे. या निर्यातीमुळे देशातील कापूस उत्पादकांची आर्थिक कोंडी गिरणी मालकांना करता येणार नाही. सह. सूत गिरण्यांनाही आपली कार्यक्षमता वाढवावी लागेल.

●●●

## बातम्या : नव्या युगाच्या

## साखरेचा आंतरराज्य व्यापार खुला

साखरेच्या आंतरराज्य व्यापारास डिसेंबर १९७९ पासून असलेली बंदी उठविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. याशिवाय, कारखानदारांवर असलेली प्रत्येक आठवड्यास २० टक्के साखर विक्रीची सक्ती रद्द करण्यात आली असून यापुढे त्यांना पंधरा दिवसांत ५० टक्के या प्रमाणे साखरेची विक्री करता येईल.

(आधार : लोकसत्ता २९/१२/९१)

## शेतकऱ्यांना रास्त भाव देण्याच्या उद्देशाने –

केंद्र शासनाने रास्त भावाच्या दुकानातील अन्नधान्याच्या किंमतीत वाढ घोषित केली आहे. या वाढीची घोषणा करतांना केंद्रीय अन्नमंत्री श्री. तरुण गोगई म्हणाले की ”अन्नधान्याच्या किंमती वाढविण्याचा हा निर्णय ‘दुःखदायक’ असला तरी त्याला पर्याय नाही. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना रास्त किंमती मिळाव्यात, फुकापासरी माल विकावा लागण्याच्या अगतिकतेतून त्यांची सुटका व्हावी तसेच अंशतः का होईना, सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील खर्चाचा बोजा कमी व्हावा या उद्देशाने हा निर्णय घ्यावा लागत आहे.“

या दरवाढीमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील अनुदानापोटी होणारा ३०८ कोटी रुपयांचा बोजा कमी होणार आहे असेही त्यांनी सांगितले.

(आधार : इंडियन एक्स्प्रेस ३-१-९२)

*वाचकहो,*
*१० नोव्हेंबर १९९१ रोजी शेगांव येथे नव्या युगाच्या नव्या हुंकारासाठी लाखांनी शेतकरी जमले. या ‘नव्या युगा’च्या बातम्या हळूहळू येऊ लागल्या आहेत. आपल्या दृष्टीस अशी बातमी पडल्यास संघटककडे अवश्य पाठवावी.*

– संपादक

# शेतकरी महिला आघाडीने निवडणुका का लढवाव्या?

१२ फेब्रुवारी १९९२ रोजी महाराष्ट्रात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका शेतकरी महिला आघाडीने लढविण्याचा निर्धार केला असून शेतकरी संघटना सर्व शक्तीने या निवडणुकीत शेतकरी महिला आघाडीला सहकार्य करणार आहे.

अनेक वर्षे महाराष्ट्रात पंचायत राज्यांच्या निवडणुका न झाल्याने हळूहळू या संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागात 'टग्यांचे राज्य' सुरू झाले. समाजात केवळ स्त्रियांच्याच नव्हे तर सर्वांच्याच दृष्टीने असुरक्षिततेचे वातावरण तयार झाले. विकासाच्या नावावर झालेल्या प्रचंड खर्चाने विकास कोणाचाच होईनासा झाला. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन नोव्हेंबर १९८६ मध्ये चांदवड येथील महिला अधिवेशनाने 'आयाबहिणीं'चे राज्य आणण्याचा संकल्प सोडून जिल्हा परिषदेच्या निवडणुकांत १०० टक्के जागी महिला उमेदवार उभे करण्याचे जाहीर केले. त्या दृष्टीने बांधणी सुरू केली. शेतकरी महिला आघाडीने त्या नंतर इतर महिला संघटना व राजकीय पक्षांच्या महिला आघाड्यांबरोबर संपर्क साधून समग्र महिलांची एक आघाडी बनविण्याचे अनेक प्रयत्न केले, पण त्यात यश आले नाही.

दरम्यान, शेतकरी महिलांचा शेतकरी आंदोलनातील वाढता सहभाग, शेतकरी महिला आघाडीची 'जिल्हा परिषद कब्जा' व 'दारू दुकान बंदी' आंदोलने यांच्या प्रभावामुळे महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व नगरपरिषदांमध्ये स्त्रियांसाठी ३० टक्के राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेतला.

शेतकरी महिला आघाडीचा स्त्रियांसाठी राखीव जागा या संकल्पनेला विरोध आहे. त्याचप्रमाणे, या राखीव ३० टक्के जागा निर्धारित करण्याच्या शासनाच्या पद्धतीलाही विरोध आहे. पण समग्र महिलांची एक आघाडी बनण्यातील सर्व अडचणी निदर्शनास आल्यानंतर शेतकरी महिला आघाडीने 'अयाबहिणीं'चे राज्य आणण्याच्या कार्यक्रमातील पहिले पाऊल म्हणून या ३० टक्के व जेथे शक्य असेल तेथे बिनराखीव जागांवरही निवडणुका स्वतंत्रपणे लढविण्याचा निर्णय घेतला.

शेतकरी महिला आघाडीने ही संधी चुकविली तर काय होईल? सर्वच राजकीय पक्षांच्या महिला आघाड्या या नावापुरत्याच असतात आणि त्यात प्रामुख्याने प्रस्थापित पुढाऱ्यांच्या नात्यागोत्यातील महिलांचाच भरणा अधिक असतो. स्त्रियांच्या खऱ्याखुऱ्या समस्यांची जाण त्यांना असेलच असे नाही. कारभाऱ्यांची इच्छा म्हणून आणि नैमित्तिक हौस म्हणून त्या या कामात असण्याची शक्यता जास्त. अशा परिस्थितीत, शासनाने राखीव म्हणून जाहीर केलेल्या जागी पुढाऱ्यांच्याच नात्यागोत्यातल्या स्त्रिया उभ्या करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. पुढच्या निवडणुकीत आजचे राखीव मतदार संघ बिनराखीव होणार आहेत. तेव्हा पुन्हा आपल्याला त्या जागी जाता यावे यासाठी पुढाऱ्यांची धडपड चालणार आहे. या पक्षांतील स्त्रियांच्या प्रश्नाची खरोखरी जाण असणाऱ्या महिला त्या पुढाऱ्याघरच्या नाहीत म्हणून मागे पडतील आणि इच्छा असो नसो पुढाऱ्याघरच्या स्त्रियांना पुढाऱ्याची खुर्ची निदान पुढील काळासाठी 'राखून' ठेवण्यासाठी पाठविले जाईल. इतर महिला संघटनांचा त्यांचे कार्यक्रम व ग्रामीण भागातील सामाजिक परिस्थिती यांमुळे प्रभाव फारच थोडा आहे.

शेतकरी महिला आघाडीने या परिस्थितीत गप्प रहायचे ठरविले तर 'आयाबहिणीं'चे राज्य आणण्यासाठी ३० टक्के किलकिल्या झालेल्या या दारातून आत जाणाऱ्या स्त्रियामुळे टग्यांच्याच खुर्च्या पुढील काळासाठी राखून ठेवण्याचे काम होईल आणि खऱ्याखुऱ्या विकासाचा मार्ग खुलाच होणार नाही.

शेतकरी महिला आघाडी ही महाराष्ट्रभरच्या ग्रामीण भागातील महिलांचे सर्वंकष प्रतिनिधित्व करणारी एकमेव संघटना आहे. शेतीच्या लुटीविरुद्ध सुरू झालेल्या शेतकरी आंदोलनात ती शेतकरी स्त्री म्हणून, म्हणजे प्रत्यक्ष शेती करणारी, शेतीतील तोट्याच्या दुष्परिणामांचा अनुभव घेणारी स्त्री म्हणून स्वतःच्या बुद्धीने लढायला घरातून बाहेर आली. घामाच्या दामाच्या मागणीबरोबरच तिने आपल्या स्त्री म्हणून असलेल्या समस्यांविरुद्ध लढण्याची तयारी केली. यातून उभी राहिलेली संघटना म्हणजेच शेतकरी महिला आघाडी होय.

१९८६ ते १९९१ या चार वर्षांच्या काळामध्ये शेतकरी महिला आघाडीतल्या महिलांनी शेतकरी आंदोलनातील सहभाग, जिल्हा परिषद कब्जा आंदोलन, दारू दुकानबंदी आंदोलन, वेगवेगळ्या ग्रामपंचायतींचा कारभार आणि स्त्रियांना संपत्तीअधिकार मिळवून देणारा लक्ष्मीमुक्ती कार्यक्रम अशा विविध मार्गांनी आपले 'स्वयंसिद्ध' सामर्थ्य सिद्ध केले आहे.

या सामर्थ्याच्या साहाय्याने समाजाच्या विकासाची प्रक्रिया योग्य मार्गावर आणण्याची सुरुवात करण्याची ही संधी हाती आली आहे. या निवडणुकीत शेतकरी महिला आघाडी घरी बसली तर हाती आलेली संधी निसटून तर जाईलच पण 'टग्यां'ची फत्ते होऊन 'अयाबहिणीं'ची आणखी पीछेहाट होईल.

'स्त्री-शक्तीच्या जागरणात स्त्री-पुरुष मुक्ती' हे घोषवाक्य शेतकरी संघटनेने चांदवडच्या महिला अधिवेशनात स्वीकारले आणि गेल्या चार वर्षात शेतकरी महिला आघाडीच्या वेगवान वाटचालीने या घोषवाक्यातील सत्याची आनंदानुभूती महाराष्ट्रातील शेतकरी समाज घेत आहे. या अनुभूतीचा आविष्कार म्हणूनच शेतकरी संघटनेने शेतकरी महिला आघाडीचा निवडणुकीचा निर्णय सर्व शक्तीने पूर्णपणे अंमलात आणण्याचे ठरविले आहे.

शेतकरी महिला आघाडीचा या निवडणुकीतील कार्यक्रम आहे –

**स्त्रीचा सन्मान, लक्ष्मीमुक्ती, दारू दुकानबंदी आणि पाणी, औषध, जळण व रोजगार यांची महिलाप्रधान व्यवस्था.**

**– सुरेशचंद्र म्हात्रे**

# सीतामाईच्या दुसऱ्या वनवासाची कहाणी - ३

**अग्निदिव्यातून निष्कलंकपणे बाहेर आलेल्या सीतेला सोबत घेऊन प्रभु रामचंद्र अयोध्येत आले आणि राज्यकारभारातून उरलेला वेळ बागबगीच्यांमध्ये, अंतःपुरात तिच्याबरोबर घालवू लागले. काही काळानंतर सीता गर्भवती झाल्याचे पाहून श्रीरामांनी आनंद व्यक्त करून गर्भवतीची इच्छा विचारली. गंगातटावरील तपोवनांत ऋषिमुनींच्या सान्निध्यात एक रात्र घालविण्याची इच्छा सीतामाईने व्यक्त केली. त्यानंतर, मित्रमंडळीत गप्पागोष्टी करीत असता प्रभु रामचंद्रांनी, खोदून खोदून, लोक आपल्याबद्दल वाईट तर बोलत नाहीत ना म्हणून प्रश्न विचारले. मित्रांनी काय सांगितले, श्रीरामचंद्रांनी आपल्या गर्भवती पत्नीची इच्छा कशी पूर्ण केली?.........**

**(श्री वाल्मीकीरामायणाच्या उत्तर कांडातील काही सर्ग)**

## त्रेचाळीसाचा सर्ग

### भद्राने पूरवासींच्या मुखांतून सीतेविषयी ऐकलेली अशुभ चर्चा श्रीरामांना कथन करणे

तेथे बसलेल्या महाराज श्रीरामांपाशी अनेक प्रकारच्या कथा सांगण्यात कुशल आणि हास्यविनोद करणारे असे मित्र सगळीकडून येऊन बसत असत. विजय, मधुमत्त, काश्यप, मंगल, कुल, सुराजी, कालिय, भद्र, दंतवक्त्र आणि सुमागध, अशी त्या सख्यासोबत्यांची नावे होती. ते सर्व लोक मोठ्या आनंदाने महात्मा श्रीरघुनाथांना नाना प्रकारच्या हास्यविनोदपूर्ण गोष्टी सांगत असत. (१-३)

अशाच एका वेळी कोठल्यातरी कथेच्या ओघात राघवांनी विचारले, 'भद्रा, सध्या नगरात आणि राज्यात कुठल्या गोष्टीची चर्चा विशेषत्वानें ऐकू येते? पौरजन आणि जनपदवासी माझ्या, सीतेच्या, भरताच्या आणि लक्ष्मणाच्या संदर्भात, तसंच शत्रुघ्नाविषयी आणि माता कैकयीविषयी काय काय बोलत असतात? कारण राजा जर आचार-विचारानं हीन असला तर तो आपल्या राज्यात, तसंच वनांतही निंदेचा विषय होतो. सर्वत्र त्याच्या वाईट वागणुकीची चर्चा होत असते.' श्रीरामचंद्र असे म्हटल्यावर भद्र हात जोडून म्हणाला, 'महाराज, तुमच्याविषयी पुरोवासी नेहमी चांगलेच उद्गार काढतात. सौम्य पुरुषोत्तमा, दशाग्रीवाचा वध करून तुम्ही जो विजय मिळविला त्यावरच सध्या नागरिक विशेषत्वानं गप्पा मारीत असतात.' (४-८)

भद्र असे म्हणाल्यावर श्रीरघुनाथ म्हणाले, 'नागरिक माझ्याविषयी जे शुभाशुभ बोलत असतील ते मला यथार्थ रूपानं, जसंच्या तसं सांग. त्यांचे शुभबोल ऐकून, ज्यांना ते शुभ मानतात त्या गोष्टींचं मी आचरण करीन. आणि अशुभ गोष्टी ऐकून ज्याला ते अशुभ मानतात, त्या गोष्टींचा मी त्याग करीन. तू विश्वासूपणानं आणि निश्चिंतपणानं काही आडपडदा न ठेवता सांग. पुरोवासी आणि जनपदातले लोक माझ्याविषयी काय चांगलं-वाईट बोलत असतील ते मला सांग.'

श्रीरघुनाथ असे म्हणाल्यावर भद्र हात जोडून, एकाग्रचित्त होऊन त्या महाबाहू श्रीरामांना रुचिर पद्धतीने म्हणाला, 'राजन्, ऐका तर, पौरजन चौकात, बाजारात, मार्गावर, तसंच वनात आणि उपवनातदेखील तुमच्याविषयी काय शुभाशुभ बोलतात ते मी सांगतो आहे. ते म्हणतात की, श्रीरामांनी सेतुबंधनाचं दुष्कर कर्म करून दाखविलं आहे. असं कर्म तर पूर्वीच्या कुणी देवांनी आणि दानवांनीदेखील ऐकलं नसेल. श्रीरामांकडून दुर्धर्ष रावण सेना आणि स्वाऱ्यांसह मारला गेला. तसंच राक्षसांसह अस्वल आणि वानरदेखील श्रीरामांना वश झाले. (९-१५)

'परंतु एक गोष्ट मात्र खटकते, युद्धात रावणाला मारून श्रीरघुनाथ सीतेला आपल्या घरी घेऊन आले. त्यांच्या मनात सीतेचं चरित्र पाहून काहीही किंतू आला नाही. त्यांच्या हृदयाला सीतेशी संभोगाचं सुख कसं वाटत असेल? पूर्वी रावणानं बलपूर्वक सीतेला कवेत घेऊन तिचं अपहरण केलं होतं. मग तो तिला लंकेलाही घेऊन गेला आणि तिथं त्यानं सीतेला अंतःपुराच्या क्रीडाकाननात, अशोकवनात ठेविलं. अशा प्रकारे राक्षसाला अंकित होऊन ती खूप दिवसपर्यंत तिथं राहिली. तरीही श्रीरामांना तिची घृणा कशी वाटली नाही? आता आम्हांलादेखील स्त्रियांचं असं वर्तन सहन करावं लागेल. कारण राजा जसं करतो ते पाहून प्रजादेखील त्याचंच अनुकरण करू लागते.' राजन्, अशाप्रकारे सर्व नगरातले आणि जनपदातले निवासी खूपसे काही बोलत असतात.' (१६-२०)

भद्राचे हे म्हणणे ऐकून श्रीरघुनाथ अत्यंत व्यथित झाले. त्यांनी समस्त सुहृदांना विचारले, 'तुम्हीदेखील मला सांगा, की हे कुठपर्यंत योग्य आहे?' तेव्हा सर्वांनी धरणीवर मस्तके टेकविली आणि श्रीरामचंद्रांना प्रणाम करून ते करुण वाणीने म्हणाले, 'प्रभो, भद्राचं हे कथन ठीक आहे यात शंका नाही.' सगळ्यांच्या मुखांतून याप्रमाणे ऐकल्यावर शत्रूसूदन श्रीरामांनी तत्काळ त्या सर्व सुहृदांना निरोप दिला.

## चव्वेचाळिसावा सर्ग

### श्रीरामांच्या निरोपावरून सर्व बंधूंचे त्यांच्यापाशी आगमन

मित्रमंडळींना निरोप देऊन श्रीरघुनाथांनी बुद्धिनिष्ठ विचार करून आपले कर्तव्य निश्चित केले आणि ते निकटवर्ती द्वारपालाला म्हणाले, 'तू सत्वर जा आणि महाभाग भरत, सुमित्राकुमार शुभलक्षण लक्ष्मण, तसेच अपराजित वीर शत्रुघ्नालादेखील इथं बोलावून आण.' श्रीरामांचा हा आदेश ऐकून द्वारपालाने मस्तकावर अंजली बांधून त्यांना प्रणाम केला आणि लक्ष्मणाच्या निवासाशी येऊन परवानगीशिवाय आत प्रवेश केला. तेथे हात जोडून जयजयकार करीत तो महात्मा लक्ष्मणाला म्हणाला, 'कुमार, महाराज तुमची भेट घेऊन इच्छितात. तेव्हा लवकर चला, विलंब करू नका.' तेव्हा सुमित्राकुमार लक्ष्मणाने 'ठीक' असे म्हणून श्रीरामंद्रांचा आदेश शिराधार्य मानला आणि तत्काळ रथावर बसून तो श्रीरघुनाथांच्या भवनाकडे वेगाने निघाला. (१-५)

लक्ष्मणाला जाताना पाहून द्वारपाल मग भरताकडे गेला. आणि त्याला हात जोडून, जयजयकार करून, विनीतभावाने म्हणाला, 'प्रभो, महाराज आपल्याला भेटू इच्छितात.' श्रीरामांनी पाठविलेल्या द्वारपालाच्या मुखातून हे वचन ऐकून महाबली भरत आपल्या आसनावरून उठून उभा राहिला आणि त्वरेने पायीच निघाला. भरताला जाताना पाहून द्वारपाल उतावीळीने शत्रुघ्नाच्या भवनात गेला आणि हात जोडून म्हणाल, 'रघुश्रेष्ठा, चला माझ्याबरोबर या. राजा श्रीराम आपल्याला पाहू इच्छितात. श्रीलक्ष्मण आणि महायशस्वी भरत

पूर्वीच तिकडे गेले आहेत.' द्वारपालाचे म्हणणे एकून शत्रुघ्न आपल्या उत्तम आसनावरून उठला आणि जमिनीवर माथे टेकवून, मनोमन श्रीरामांना वंदन करून त्यांच्या निवास्थानाकडे निघाला. (६-१०१/२)

द्वारपाल येऊन श्रीरामांना हात जोडून निवेदन करता झाला, की, 'प्रभो, तुमचे सारे भाऊ दारपाशी उपस्थित आहेत.' कुमारांचे आगमन ऐकून, चिंतेने व्याकुळ इंद्रिये झालेल्या श्रीरामांनी मस्तक वर न करताच दुःखी मनाने द्वारपालाला आदेश दिला. 'तू तिन्ही राजकुमारांना लवकर माझ्याकडे घेऊन ये. माझं जीवन त्यावरच अवलंबून आहे. ते जणू माझे प्रिय प्राणच आहेत.' महाराजांची आज्ञा होताच ते श्वेतवस्त्रधारी कुमार मस्तक झुकवून, हात जोडून एकाग्रचित्त होऊन भवनात गेले. त्यांनी श्रीरामांचे मुख उदास झालेले पाहिले, संध्याकाळच्या सूर्याप्रमाणे ते निष्प्रभ दिसत होते. त्यांनी वारंवार पाहिले, तेव्हा बुद्धिमान श्रीरामांच्या दोन्ही डोळ्यांत अश्रू तरळत होते आणि त्यांच्या मुखकमलाची शोभा हरपली होती. (११-१६)

त्यानंतर त्या तीन भावांनी त्वरेने श्रीरामांच्या चरणांवर मस्तक ठेवून प्रणाम केला. मग ते सर्वजण प्रेमाने समाधिस्थ झाल्यासारखे बसून राहिले. त्यावेळी श्रीराम अश्रू ढाळीत होते. महाबली रघुनाथांनी दोन्ही बाहूंनी उचलून, त्या सर्वांना आलिंगन दिले. आणि ते म्हणाले, 'या. आसनावर बसा.' जेव्हा ते बसले, तेव्हा राम पुनः म्हणाले, 'राजकुमारांनो, तुम्ही माझं सर्वस्व आहात. तुम्हीच माझं जीवन आहात. तुम्ही संपादित केलेल्या या राज्याचा मी केवळ पालक आहे. नरेश्वरांनो, तुम्ही सर्व शास्त्र जाणणारे आणि त्यात सांगितलेल्या कर्तव्यांचं पालन करणारे आहात. तुमची बुद्धी परिपक्व आहे. यावेळी मी जे काम तुमच्या समोर उपस्थित करणार आहे, त्याचं तुम्ही साऱ्यांनी मिळून संपादन करावं.' श्रीरामचंद्र असे म्हणाल्यावर ते सर्व बंधू सावधान झाले. सर्वांची मने उद्विग्न झाली आणि सर्वजण विचार करू लागले, न जाणो महाराज आम्हाला आता काय सांगतात? (१७-२१)

## पंचेचाळिसावा सर्ग

### श्रीरामांनी बंधूंशी सर्वत्र पसरलेल्या लोकापवादाविषयी चर्चा करून सीतेला वनात सोडून येण्याविषयी

### लक्ष्मणाला आदेश देणे

अशा प्रकारे सर्व बंधू दुःखी मनाने तेथे बसले होते, त्यावेळी श्रीराम शुष्कमुखाने त्यांना म्हणाले, 'बंधूंनो, तुमचं कल्याण असो. तुम्ही सर्वजण माझं म्हणणं लक्षपूर्वक ऐका, मन विचलित होऊ देऊ नका. पुरोवासींमध्ये माझ्या आणि सीतेच्या संबंधानं, ज्याप्रमाणं चर्चा चालू आहे ते सांगतो आहे. यावेळी पौरजनांत आणि जनपदातल्या लोकांत सीतेसंबंधी महान अपवाद पसरला आहे. माझ्याविषयी देखील त्यांना घृणा वाटते. त्या साऱ्यांची ती घृणा माझं मर्मस्थळ विदीर्ण करून टाकते. मी बीभत्स वर्तन केलं असं त्यांना वाटतं. मी इक्ष्वाकुवंशी महात्मा नरेशांच्या कुलात जन्मलो आहे. सीतादेखील महात्मा जनकांच्या उत्तम कुलातून आली आहे. सौम्य लक्ष्मणा, तू तर ते जाणतोसच की रावण कशाप्रकारे तिला निर्जन दंडकारण्यातून पळवून घेऊन गेला होता. मी त्याचा विध्वंस करून टाकला हेही तू पाहिलंस. (१-५)

'त्यानंतर लंकेतही जानकीविषयी माझ्या अंतःकरणात असा विचार उत्पन्न झाला होता की, ही इतके दिवस इथं राहू नये. मी हिला राजधानीत कसा घेऊन जाऊ शकेन? सुमित्राकुमारा, त्यावेळी आपल्या पावित्र्याची साक्ष पटविणाऱ्या सीतेने तुझ्यासमोरच अग्नीत प्रवेश केला होता आणि देवांसमक्ष स्वतः अग्निदेवांना मी निर्दोष आहे, असं सांगितलं होतं. आकाशचारी वायू, चंद्र आणि सूर्यानंदेखील पूर्वी देवांजवळ आणि समस्त ऋषींजवळ जनकनंदिनी निष्पाप असल्याचं कथन केलं होतं. अशाप्रकारे विशुद्ध आचारांनी सीता देवगंधर्वांसमोर साक्षात महेंद्रानं लंकाद्वीपात माझ्या हाती सोपविली होती. माझ्या अंतरात्म्यालादेखील यशस्विनी सीता शुद्ध आहे, असं वाटतं. म्हणून मी या विदेहनंदिनीला घेऊन आयोध्येला आलो होतो. (६-१०)

'परंतु आता हा लोकापवाद पसरू लागला आहे. पुरवासी आणि जनपदीय माझी मोठी निंदा करीत आहेत. म्हणून माझं हृदय शोकग्रस्त झालं आहे. ज्या कुठल्याही प्राण्याची अपकीर्ती लोकांचा चर्चेचा विषय बनते, तो अधम नरकात पडतो आणि जोपर्यंत त्याच्या अपयशाची चर्चा होत राहाते. तोपर्यंत तो तिथंच पडून राहातो. देवगण लोकातल्या, अपकीर्तीची निंदा आणि कीर्तीची प्रशंसा करतात. सर्वश्रेष्ठ महात्म्यांचं सर्व शुभ कर्म उत्तम कीर्ती स्थापण्यासाठीच योजलेलं असतं. नरश्रेष्ठ बंधूंनो, मी लोकनिंदेच्या भयानं माझ्या प्राणांचा आणि तुम्हा सर्वांचादेखील त्याग करू शकेन, मग सीतेचा त्याग करणं कोणती विशेष गोष्ट आहे? ह्या दृष्टीनं माझ्याकडं पाहा. मी शोकसागरात पडलो आहे. याहून अधिक एखादं दुःख मला सहन करावं लागलं आहे, असं माझ्या आठवणीत नाही. (११-१५)

'तेव्हा सुमित्राकुमारा, उद्या सकाळी तू सारथी सुमंत्रानं संचलित केलेल्या रथावर आरूढ होऊन, सीतेला देखील त्यात बसवून या राज्याच्या सीमेबाहेर सोडून ये. गंगेच्या पहिल्या तीरावर तमसातटावर महात्मा वाल्मीकिमुनींचा दिव्य आश्रम आहे. रघुनंदना, त्या आश्रमाजवळ निर्जन वनात सीतेला सोडून तू सत्वर परत ये. सुमित्रानंदना, माझ्या या आज्ञेचं पालन कर. सीतेविषयी माझ्याशी कुठल्याही प्रकारे प्रतिवक्तव्य करण्याचा प्रयत्न करू नकोस. लक्ष्मणा, आता तू जा. या विषयावर आणखी विचार करू नकोस. जर माझ्या या निश्चयावर तू कुठल्याही प्रकारची अडचण आणलीस, तर मला मोठे कष्ट होतील. (१६-२०)

'मी तुझ्या पावलांची आणि जीवनाची शपथ घालून सांगतो की, माझ्या निर्णयाविरुद्ध काही बोलू नकोस. जे माझ्या या कथनामध्ये पडून कुठल्याही प्रकारे माझा अनुनय, विनवणी करण्यासाठी काही बोलतील ते माझ्या अभीष्टकार्यात बाधा आणताहेत असं मानून मी त्यांना शत्रू समजेन. जर तुम्ही लोक मला मानत असाल आणि माझी आज्ञा पाळू इच्छित असाल, तर आता सीतेला इथून वनात घेऊन जा. माझ्या या आज्ञेचं पालन करा. सीता पूर्वी मला म्हणाली होती, की मी गंगातटावरील ऋषींचे आश्रम पाहू इच्छिते. म्हणून तिची ही इच्छादेखील पूर्ण करण्यात यावी.' अशाप्रकारे बोलताना श्रीरघुनाथांचे दोन्ही डोळे अश्रूंनी भरून आले. मग ते धर्मात्मा श्रीराम आपल्या बंधूंसह प्रासादात निघून गेले. त्यावेळी त्यांचे हृदय शोकाकुल झाले होते आणि ते हत्तीप्रमाणे दीर्घ श्वास घेत होते. (२१-२५)

## सेहेचाळिसाव सर्ग

### लक्ष्मणाने सीतेला रथावर बसवून तिला वनात सोडण्यासाठी घेऊन जाणे आणि गंगेच्या तटावर पोहोचविणे

त्यानंतर जेव्हा रात्र संपली आणि सकाळ झाली तेव्हा लक्ष्मणाने मनोमन दुःखी होऊन

शुष्कमुखाने सुमंत्राला आज्ञा केली, 'सारथ्या, एका उत्तम रथाला शीघ्रगामी घोडे जोड आणि त्या रथात सीतेसाठी सुंदर आसन पसर. मी महाराजांच्या आज्ञेनं सीतादेवीला पुण्यकर्मा महर्षींच्या आश्रमात पोहचवू इच्छितो. सत्वर रथ घेऊन ये.' तेव्हा सुमंत्र 'जशी आज्ञा' असे म्हणून त्वरेने उत्तम घोडे जुंपलेला एक सुंदर रथ घेऊन आला. त्या रथावर सुखद शय्येने युक्त असे एक सुंदर आसन घातले होते. रथ आणून तो मित्रांचा मान वाढवणाऱ्या सुमित्राकुमाराला म्हणाला, 'प्रभो, हा पाहा रथ आला. आता जे काही करायचं ते करा.' (१-५)

सुमंत्र असे म्हणाल्यावर नरश्रेष्ठ लक्ष्मण राजमहालात गेला आणि सीतेजवळ जाऊन म्हणाला, 'देवी, तू महाराजांपाशी मुनींच्या आश्रमात जाण्यासाठी वरयाचना केली होतीस आणि महाराजांनी तुला आश्रमावर पोहचविण्याची प्रतिज्ञा केली होती. देवी, विदेहनंदिनी, त्या संभाषणाला अनुसरून मी राजाज्ञेनं त्वरेनं हा रथ गंगातटावरच्या ऋषींच्या सुंदर आश्रमांपाशी घेऊन जाईन आणि तुला मुनिजनसेवित वनात पोहोचवीन.' महात्मा लक्ष्मण असे म्हणाल्यावर विदेहनंदिनी सीतेला अत्यंत आनंद झाला आणि ती निघण्यासाठी सज्ज झाली. बहुमोल वस्त्रे आणि नाना प्रकारची रत्ने घेऊन वैदेही सीता वनयात्रेसाठी निघाली. त्यावेळी ती लक्ष्मणाला म्हणाली, 'ही सारी बहुमोल वस्त्रं, आभूषणं आणि नाना प्रकारचं रत्नधन मी मुनिपत्नींना देईन.' (६-११)

लक्ष्मणाने, 'ठीक' असे म्हणून मिथिलेशकुमारी सीतेला रथावर बसविले आणि श्रीरघुनाथांची आज्ञा ध्यानात ठेवून त्या वेगवान घोड्यांच्या रथावर चढून तो वनाकडे निघाला. त्यावेळी सीता लक्ष्मीवर्धन लक्ष्मणाला म्हणाली, 'रघुनंदना, मला खूपसे अपशकुन दृष्टीस पडत आहेत. आज माझा डावा डोळा स्फुरतो आहे आणि माझी गात्रं कंपित होत आहेत. सुमित्राकुमारा, माझं हृदय अस्वस्थ झालं आहे, असं मला वाटतं आहे. माझ्या मनात कसलं तरी औत्स्युक्य निर्माण झालं आहे आणि माझी अधीरता पराकाष्ठेला पोहोचली आहे. विशाललोचन लक्ष्मणा, मल पृथ्वी शून्यवत झाल्यासारखी वाटते आहे. भातृवत्सला, तुझे बंधू सुखरूप राहावेत. वीरा, माझ्या सर्व सासवा समान रूपानं आनंदात असाव्यात. नगर आणि जनपदातलेदेखील सर्व प्राणी कुशल राहावेत.' असं म्हणणाऱ्या सीतेने हात जोडून देवांना प्रार्थना केली. सीतेचे वचन एकून लक्ष्मणाने तिला वंदन केले आणि वरवर प्रसन्नपणे परंतु कोमेजलेल्या अंतःकरणाने तो म्हणाला, 'सर्वांचं कल्याण होवो.' (१२-१८)

त्यानंतर गोमतीच्या तीरावर पोहोचल्यावर एका आश्रमात त्या सर्वांनी रात्रीचा मुक्काम केला. मग सकाळी उठून सुमित्राकुमार सारथ्याला म्हणाला, 'सारथ्या, लवकर रथ जुंप. आज मी भागीरथीचं जल माझ्या मस्तकावर धारण करीन. ज्याप्रमाणं भगवान शंकरांनी आपल्या तेजानं भागीरथीला मस्तकावर धारण केलं होते, त्याप्रमाणं मीही आज ते जल मस्तकी धारण करीन.' सारथ्याने चार मनोवेगी घोडे आणून ते रथाला जुंपले आणि विदेहनंदिनी सीतेला हात जोडून तो म्हणाला, 'देवी, रथावर आरूढ व्हावं.' सूताच्या वचनानुसार देवी सीता त्या उत्तम रथावर आरूढ झाली. अशाप्रकारे सुमित्राकुमार लक्ष्मण आणि बुद्धिवान सुमंत्रासह विशाललोचना सीतेदवी पापनाशिनी गंगेच्या तटावर जाऊन पोहोचली. दुपारच्या वेळी भागीरथीच्या जलाशयापाशी पोचल्यावर लक्ष्मण तिकडे पाहात दुःखी होऊन उच्चस्वराने हमसाहमशी रडू लागला. (१९-२४)

लक्ष्मण शोकातुर झालेला पाहून धर्मज्ञ सीता अत्यंत चिंतीत होऊन त्याला म्हणाली, 'लक्ष्मणा, हे काय, तू का रडतो आहेस? गंगेच्या तटावर आल्यामुळं माझी चिरकालची अभिलाषा पूर्ण झाली आहे. अशा आनंदाच्या वेळी तू रडून मला दुःखी का करतो आहेस? पुरुषप्रवरा, तू सदैव श्रीरामांजवळच राहतोस. केवळ दोन दिवसच त्यांचा वियोग झाल्यामुळं तू इतका शोकाकुल झाला आहेस का? लक्ष्मणा, श्रीराम तर मलादेखील प्राणाहून अधिक प्रिय आहेत. परंतु मी अशा प्रकारे शोक करीत नाही. तूही असा बालिश होऊ नकोस. मला गंगेच्या पैलतीरावर घेऊन चल आणि तपस्वी मुनींचं दर्शन घडीव. मी त्यांना वस्त्रं आणि आभूषणं देईन. त्यानंतर त्या महर्षींना यथायोग्य अभिवादन करून तिथं एक रात्र राहून आपण पुनः अयोध्यापुरीला परतू. माझं मनदेखील सिंहासारखं वक्षस्थळ, कृश उदर आणि कमळसारखे नेत्र असलेल्या श्रीरामांना पाहण्यासाठी उतावीळ झालं आहे. कारण ते मन रमविणाऱ्यांमध्ये सर्वश्रेष्ठ आहेत. (२५-३१)

सीतेचे हे वचन ऐकून शत्रुवीरांचा संहार करणाऱ्या लक्ष्मणाने आपले दोन्ही सुंदर डोळे पुसले आणि त्याने नाविकांना बोलाविले. तेव्हा नाविक हात जोडून म्हणाले, 'प्रभो, ही नाव सज्ज आहे.' लक्ष्मण गंगापार करण्यासाठी सीतेसह त्या सुंदर नौकेवर बसला आणि काळजीपूर्वक त्यांनी सीतेला गंगेच्या पैलतीरावर पोहोचविले. (३२-३३)

## सत्तेचाळिसावा सर्ग

### लक्ष्मणाने सीतेला नावेतून गंगेच्या पैलतीरावर पोहोचवून मोठ्या दुःखाने तिला तिच्या त्यागाची हकीगत सांगणे.

निषादांची ती नाव विस्तृत आणि सुसज्ज होती. लक्ष्मणाने तिच्यावर प्रथम सीतेला चढविले आणि मग तो स्वतः चढला. त्याने रथासह सुमंत्राला काठावरच थांबण्याचा आदेश दिला आणि शोकसंतप्त झालेला तो लक्ष्मण नाविकाला म्हणाला, 'चल'. त्यानंतर भागीरथीच्या पैलतीरावर पोहोचल्यावर लक्ष्मणाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि तो मिथिलेशकुमारी सीतेला हात जोडून म्हणाला, 'विदेहनंदिनी, माझ्या हृदयात सर्वात मोठं शल्य हेच आहे की, आज रघुनाथांनी बुद्धिमान असूनही माझ्यावर जे काम सोपविलं आहे, त्यामुळे लोकांत माझी मोठी निंदा होईल. अशा अवस्थेत मला मरणासन्नपणा आला असता किंवा साक्षात माझा मृत्यू जरी झाला असता तरी ते माझ्या कल्याणाचं ठरलं असतं. परंतु या लोकनिंद्य कार्यात मला गुंतविणं उचित नव्हतं. शोभने, तू प्रसन्न हो आणि मला दोष देऊ नकोस.' असं म्हणून हात जोडून लक्ष्मण पृथ्वीवर कोसळला. (१-६)

लक्ष्मण हात जोडून रडतो आहे आणि स्वतःच्या मृत्यूची इच्छा करतो आहे हे पाहून मिथिलेशकुमारी सीता अत्यंत उद्विग्न झाली आणि लक्ष्मणाला म्हणाली, 'लक्ष्मणा, हे काय? मला काहीच समजेनासं झालं आहे. नीटपणे सांग. महाराज कुशल तर आहेत ना? तुझं मन स्वस्थ नाही असं मला वाटतं. मी महाराजांची शपथ देऊन विचारते, ज्या गोष्टीनं तुझा इतका संताप होतो आहे, ती मला यथार्थानं सांग. मी तुला तशी आज्ञा करते आहे.' (७-९)

विदेहनंदिनीने अशा प्रकारे उद्युक्त केल्यावर लक्ष्मण दुःखी मनाने अधोवदन होऊन आणि अश्रूंनी रुद्ध झालेल्या कंठाने म्हणाला, 'जनकनंदिनी, नगरात आणि जनपदात तुझ्याविषयी जो अत्यंत भयंकर अपवाद पसरला आहे, तो राजसभेत श्रीरघुनाथांच्या कानी पडला. त्यामुळं त्यांच्या हृदयाचा संताप झाला आहे आणि

ते मला सर्व काही सांगून भवनात निघून गेले. देवी, राजा श्रीरामांनी जी अपवादवचनं आपल्या हृदयात ठेवली आहेत, त्यांचं दुःख त्यांना सहन होत नाही. ती मी तुझ्यासमोर सांगूही शकत नाही. त्यामुळं मी त्यावर चर्चा करणं सोडून दिलं आहे. तू माझ्यासमोर निर्दोष असल्याचं सिद्ध झालं आहे. तरीही महाराजांनी लोकापवादाला घाबरून तुझा त्याग केला आहे. देवी, आता आणखी काहीही विचारू नकोस आणि लक्षात घेऊ नकोस. आता महाराजांची आज्ञा मानून, तसंच तुझीदेखील अशीच इच्छा आहे असं समजून मी आश्रमापाशी तुला घेऊन जाईन आणि तिथंच सोडून देईन. (१०-१४)

'शुभे, हे पाहा, गंगेच्या तटावर असलेलं ब्रह्मर्षींचं पवित्र आणि रमणीय तपोवन, तू विषाद करू नकोस. इथं माझ्या पित्याचे, राजा दशरथाचे घनिष्ट मित्र महायशस्वी ब्रह्मर्षी मुनिवर वाल्मीकी राहातात. तू त्याच महात्म्याच्या चरणसावलीचा आश्रय घेऊन इथं सुखानं राहा. जनकात्मजे, तू इथं उपवासपरायण आणि एकाग्र होऊन काळ कंठावास. देवी, तू सदैव श्रीरघुनाथांना हृदयात ठेवून पातिव्रत्याचं पालन कर. असं केल्यानं तुझं परमकल्याण होईल.' (१५-१८)

●●●

# शेतकरी संघटक आजीव वर्गणीदार

## (३१ डिसेंबर १९९१ पर्यंत)

७२ श्री. उद्धव आमृतराव सोळंके, पिंपळगाव (ढेंगळी) (परभणी)
७३ श्री. बाळासाहेब आमृतराव सोळंके, पिंपळगाव (ढेंगळी) (परभणी)
७४ श्री. किशोर विठ्ठलराव जोशी, पिंपळीगाव (ढेंगळी) (परभणी)
७५ श्री. उत्तम साहेबराव कटारे, धनेगांव (परभणी)
७६ श्री. प्रल्हादराव बरसाळे, सेलू (परभणी)
७७ श्री. जगदीशप्रसाद गुप्ता, सेलू (परभणी)
७८ श्री. वल्लभजी लेया, सेलू (परभणी)
७९ श्री. पांडुरंगराव मगर, सेलू (परभणी)
८० श्री. एकनाथराव पवार, झोंडगाव (परभणी)
८१ श्री. उद्धवराव पवार, झोंडगाव (परभणी)
८२ श्री. गोविंद विठ्ठल जोशी, सेलू (परभणी)
८३ श्री. किशनराव शंकरराव भाले, सेलू (परभणी)
८४ श्री. देवीदास कुलकर्णी, बाबुलतार (परभणी)
८५ श्री. वैजनाथ रसाळ, परभणी (परभणी)
८६ श्री. वसंत मुरलीधरराव शिंदे, आपेगांव (बीड)
८७ श्री. उत्तमराव सोपानराव तट, आपेगांव (बीड)
८८ श्री. सुभाष रावण काळदाते, आपेगांव (बीड)
८९ श्री. हनुमंतराव बापुराव देशमुख, अंजनपूर (बीड)
९० श्री. व्यंकटराव भानुदासराव इस्थळकर, अंजनपूर (बीड)
९१ श्री. संभाजी गोरोबा रेड्डी, अंजनपूर (बीड)
९२ सौ. विनोदीनी शिवराज तोंडचिरकर, उदगीर (लातूर)
९३ श्री. दत्तराव नाईक, सुरेगांव (परभणी)
९४ सौ. चंद्रकला खंडबाराव नाईक, वाकोडी (परभणी)
९५ श्री. हेमंत देशमुख, समर्थनगर (औरंगाबाद)
९६ श्री. अवधूत वाके, राधानगर (वर्धा)
९७ श्री. अनिल विनायकराव उमारे, म्हसाळा (वर्धा)
९८ समग्र महिला आघाडी (लातूर) आरनसाळ
९९ डॉ. नागोराव म. हनमंते, पुलगांव (वर्धा)
१०० श्री. मुरलीधर मारोती डेरकर राजुरा (चंद्रपुर)
१०१ श्री. किरण रोहिदास शिंदे, अंगलगाव (परभणी)
१०२ श्री. बाबा उद्धवराव कावळे, पवनी (चंद्रपूर)
१०३ श्री. विलास नारायणराव बोंगिरवार, राजुरा (चंद्रपूर)
१०४ श्री. देवराव विठोबा पानघाटे, भोयगांव (चंद्रपूर)
१०५ श्री. यादव श्रीराम चटप, लखनापूर (चंद्रपूर)
१०६ श्री. विलास बाळकृष्ण धांडे, गडचांदूर (चंद्रपूर)
१०७ श्री. डॉ. अमृत वासुदेव कुचनकर, राजुरा (चंद्रपुर)
१०८ श्री. डॉ. भूपाळ रघुनाथ पिंपळशेंडे, राजुरा (चंद्रपुर)
१०९ श्री. भाऊराव बाबाजी मोहितकार, कोंडशी (बु।।) (चंद्रपुर)
११० श्री. बळीराम पाटील खामनकर, माथा (चंद्रपूर)
१११ श्री. प्रभाकर विठ्ठलराव दिवे, आवाळपूर (चंद्रपूर)
११२ श्री. प्रभाकर मारोतराव ढवस, विरुर स्टेशन (चंद्रपूर)
११३ श्री. देवराव सखाराम भगत, बीबी (चंद्रपूर)
११४ श्री. वासुदेव विश्वनाथ वासेकर, चंद्रपूर (चंद्रपूर)
११५ श्री. संतोष पूंजाराम आस्वले, गोंडपिंपरी (चंद्रपूर)
११६ डॉ. गंगाधर बोढे, विहिरगांव (चंद्रपूर)
११७ सौ. रेखाताई पद्माकरराव अपराजीत, राजुरा (चंद्रपूर)
११८ श्री. वासुदेव पांडुरंग बुटले, सास्ती (चंद्रपूर)
११९ श्री. सुभाष रामगिरवार, राजुरा (चंद्रपूर)
१२० श्री. पुरुषोत्तम आस्वले, सोनुर्ली (चंद्रपूर)
१२१ डॉ. रामराव माधवराव पांचाळ, टेकामांडवा (चंद्रपूर)
१२२ श्री. भू-तृप्ती सहकारी पाणी पुरवठा संस्था म. वसगडे (कोल्हापूर)
१२३ श्री. कामधेनू सह. दूध. व्याव. संस्था मर्यादित मौजे वडगाव (कोल्हापूर)
१२४ श्री. चंद्रप्रभा वि. का. स. (वि) सेवा संस्था म. हेरले (कोल्हापूर)
१२५ श्री. नवभारत सह. दूध. व्याव. संस्था. म. वसगडे (कोल्हापूर)

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 7th January, 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
January 6, 1992

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

## पंचायत राज्य निवडणुका
# शेतकरी महिला आघाडीचा निर्णय पक्का

वर्धा येथे १५, १६, १७ डिसेंबर १९९१ रोजी झालेल्या शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या निवडणुकांत शेतकरी महिला आघाडीच्या स्त्रियांसाठी राखीव असलेल्या ३० टक्के जागा संपूर्ण महाराष्ट्रभर लढविण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सर्व शक्तीने करण्याचे ठरविण्यात आले.

त्या दृष्टीने शेतकरी संघटनेच्या कृतीसमितीच्या चार गटांनी २५ ते ३१ डिसेंबर १९९१ या काळात महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांचा दौरा करून परिस्थितीची पाहाणी केली. या सर्व गटांची एकत्र बैठक २ जानेवारी १९९२ रोजी आंबेठाण येथे झाली. या बैठकीत निरीक्षक गटांच्या अहवालावर सांगोपांग चर्चा झाली.

शेतकरी महिला आघाडी १२ जिल्ह्यांत समर्थपणे या निवडणुका लढवू शकेल तसेच अजून वीसेक तालुक्यांतही तशी चांगली स्थिती आहे असे या अहवालांवरील चर्चेतून निष्पन्न झाले. त्यावरून, शेतकरी संघटनेच्या कृतिसमितीने शेतकरी महिला आघाडीतर्फे ३० टक्के जागा लढविण्याचा निर्णय पक्का केला.

त्याशिवाय, अनेक ठिकाणी राखीव नसलेल्या सर्वसाधारण मतदार संघांतही शेतकरी महिला आघाडीच्या समर्थ कार्यकर्त्या निवडणूक लढवू शकतील अशी परिस्थिती आहे असेही या अहवालांवरून आढळून आले आहे. त्यामुळे, त्या मतदार संघातूनही शेतकरी महिला आघाडीने निवडणूक लढवावी असे ठरविण्यात आले.

उमेदवार निवडीच्या प्राथमिक कामासाठी कृतिसमितीला साहाय्यक म्हणून जिल्हावार कार्यकर्त्यांच्या उपसमित्या नेमल्या असून जिल्हा वर्तमानपत्रांतून प्रकटने देऊन इच्छुक महिला उमेदवारांचे अर्ज मागविण्याची जाबाबदारी या समितीवर सोपविण्यात आली असून इच्छुक उमेदवारांकडून अर्जासोबत शंभर रुपये शुल्क घेण्यात येणार आहे. अर्जांची छाननी करून उमेदवारांची अंतीम यादी बनविण्यासाठी सर्व जिल्ह्यांतील या उपसमित्यांची बैठक कृतिसमिती समवेत आंबेठाण येथे दि. १४ जानेवारी १९९२ रोजी बोलाविण्यात आली आहे.

शेतकरी महिला आघाडी राखीव ३० टक्के व जेथे शक्य असेल तेथे बिनराखीव सर्वसाधारण जागांवर निवडणुका लढविणार असली तरी बिनराखीव ७०% जागांवर शेतकरी संघटना स्वतःच्या नावावर या निवडणुका लढविणार नसल्याचे कृतीसमितीच्या बैठकीने स्पष्ट केले आहे.

बैठकीला सर्वश्री किशोर माथनकर, भास्करराव बोरावके, शंकर धोंडगे, बद्रीनाथ देवकर, शिवानंद दरेकर, मोहन गुंजाळ, शिवराज, अजित नरदे, सौ. सुमनताई अग्रवाल, सौ. माई बोरावके उपस्थित होते; श्री. शरद जोशी यांनी मार्गदर्शन केले.

# सीताशेती : प्रयोगसूत्र

शेतकरी संघटकच्या गेल्या दोन अंकामध्ये 'सीताशेती'च्या निमित्ताने एका प्रयोगातील दोन सूत्रे दिली आहेत. परंतु, या सूत्रांप्रमाणे प्रयोग करण्यास कोणी सुरुवात केली आहे किंवा नाही यासंबंधी काही कळू शकले नाही. या अंकात माती बनविण्याचे सूत्रे देण्याचे जाहीर केले होते. पण, प्रयोग करण्यास कुणीच तयार नसतील तर हे सदर चालू ठेवण्यात काहीच अर्थ नाही. पुढील अंकापर्यंतच्या काळापर्यंत म्हणजे (१५ जानेवारीपर्यंत) काही मायबहिणींनी तरी हा प्रयोग सुरू केला आहे असे कळले तरच हे सदर पुढे चालू ठेवण्यात येईल.

खरोखरीच कुणी प्रयोग सुरू केला असेल तर त्यांची अडचण होऊ नये म्हणून काही सूचनाः

प्रयोगासाठी १ गुंठा जमीन वापरायची ठरविली असेल तर इतक्या जमिनीसाठी एकूण ५०० किलो पूर्ण पदार्थ जमा करायला हवा. इतका कुजलेला पदार्थ तयार करावयास १००० किलो वजनाचा कुजण्यायोग्य 'कचरा' आवश्यक आहे. इतका पदार्थ जमा झाला म्हणजे १ गुंठा जागेवर पुरेशी उपजाऊ माती तयार करणे शक्य होईल.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे, शेतकरी संघटनेने मांडलेली ही 'सीताशेती'ची संकल्पना ही व्यक्तिगत किमयागारीसाठी नसून ती शेतीक्षेत्रासाठी प्रयोगशाळा उभ्या करण्यासाठी आहे. या प्रयोगशाळांचे निष्कर्ष हवामानविभागांनुसार वेगवेगळे येतील, पण ते त्या त्या विभागांमध्ये लागू पडू शकतील.

आणि तसे ते लागू पडावेत यासाठी प्रयोगक्षेत्राचा आकार किमान एक गुंठा, प्रयोगातील सर्व प्रयत्नांची, घटनांची, निरीक्षणांची आणि शक्य झाले तर निष्कर्षांची व्यवस्थित नोंद तसेच खर्चाचा व उत्पन्नाचा हिशोब या सर्व बाबी आवश्यक आहेत.

**कृषि अर्थ प्रबोधिनी,**
अंगारमळा, आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**